**MHGO050006582022**

<u>**सडक अर्जुनी येथील न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया येथील राष्ट्रीय लोकअदालतमध्ये प्रकरण २१ अन्वये आरोपीची संक्षिप्त संपरिक्षा**</u>

**<u>सं.फौ.ख.क्र.३५२/२०२२</u>**
**<u>निशाणी क्र. ०२</u>**

| | | |
|---|---|---|
| १. अपराध घडल्याचा दिनांक | — | ०८/११/२०२२ |
| २. तक्रार दाखल केल्याचा दिनांक | — | ०८/११/२०२२ |
| ३. तक्रार दाखल करणा—याचे नांव व पत्ता | — | सरकार तर्फे डुग्गीपार पोलीस स्टेशन, ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया. |
| ४. आरोपीचे नांव, वय व पत्ता | — | अशोक श्रीराम मोहतुरे, वय — ४८ वर्षे, व्यवसाय — चालक, राहणारः— नवेगावबांध, ता. अर्जुनी—मोरगाव, जि. गोंदिया. |

५. **गुन्हयाचा तपशील—**

दि. ०८/११/२०२२ रोजी दुपारी ०२.१५ ते ०२.५० वाजताच्या सुमारास मौजा नवेगाव टि पॉईंट कोहमारा, ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया येथे सार्वजनिक रस्त्यावर तुम्ही आरोपी रहदारीस अडथळा निर्माण होईल असे तुमचे ताब्यातील ऑटो क्रमांक एम.एच.३५/२९८० हे वाहन येणारे जाणारे वाहतुकीस अडथळा व लोकांना धोका होईल अशा स्थितीत हयगयीने उभे केले आणि अशा प्रकारे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम २८३ अन्वये गुन्हा केला आहे.

वरील गुन्हयासंबंधी तपशील आरोपीला वाचून व समजावून सांगितला.

**आरोपीचे प्रतिकथन**

प्रश्न—१. तुम्हाला तुमचे विरुध्द दाखल झालेल्या खटल्याचे कागदपत्र मिळाले काय ?
उत्तर होय.

प्रश्न—२. तुम्हाला तुमचेवर ठेवण्यात आलेला अपराध वाचुन दाखविला तो तुम्हास समजला काय?
उत्तर होय.

प्रश्न–३. तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर      होय, मला गुन्हा कबुल आहे.

..............................................

आरोपीची सही
दिनांक : १२.११.२०२२                                                  समक्ष,

Digitally signed by VIKRAM AMBADAS AVHAD
Date: 2022.11.12 11:37:00 +0530

( डॉ.विक्रम अं. आव्हाड )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
सडक अर्जुनी.

**न्यायनिर्णय**
**(दिनांक १२ नोव्हेंबर २०२२ रोजी पारीत)**

आरोपी विरूध्द सदरचे प्रकरण भा.दं.वि. कायदा कलम २८३ अन्वये गुन्हा केल्याबाबत दाखल करण्यात आले आहे. आरोपीने कोणत्याही दबावाखाली न येता स्वत:हुन गुन्हा कबुल केला आहे. मी आरोपीस गुन्हा कबुल केल्यानंतर होणा–या शिक्षेबाबत सविस्तर सांगितले. आरोपीने असे कथन केले आहे की, त्याच्या हातुन पहील्यांदाच गुन्हा घडला आहे. आर्थिक परिस्थिती गरीबीची असुन कमीत कमी दंड करावा अशी विनंती केली. प्रस्तुतच्या प्रकरणाची हकीकत पाहीली असता, अपराधाचे स्वरूप व सर्व परिस्थिती लक्षात घेवुन आरोपीला पुन्हा एकदा सुधारण्याची संधी देणे गरजेचे ठरते. त्यामुळे परिवीक्षा अधिनियम १९५८ नुसार आरोपीस भविष्यात चांगले वर्तन ठेवण्याची समज देवुन दंडाची शिक्षा देणे न्यायाचे होईल. करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**१)** आरोपी **अशोक श्रीराम मोहतुरे** यास भारतीय दंड विधान कलम २८३ अन्वये अपराधासाठी दोषी ठरविण्यात येते. त्यास रक्कम रूपये २००/– **(अक्षरी दोनशे रूपये फक्त)** द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. दंड न भरल्यास त्यास ०५ दिवसांचा साधा कारावास भोगावा लागेल.

**२)** फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ३६३ अन्वये सदर न्यायनिर्णयाची एक प्रत आरोपीस विनाशुल्क देण्यात यावी.

Digitally signed by VIKRAM AMBADAS AVHAD
Date: 2022.11.12 11:37:05 +0530

दिनांक : १२.११.२०२२                                      ( डॉ. विक्रम अं. आव्हाड )
ठिकाण : सडक अर्जुनी                                      न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
सडक अर्जुनी.

मी प्रमाणीत करतो की, या पीडीएफ फाईलमधील मजकुर व मुळ न्यायनिर्णय मधील मजकुर हा एकसारखाच आहे.

लघुलेखकाचे नाव : आर. डी. भुजाडे,
कोर्टाचे नाव : डॉ. वि. अं. आव्हाड,
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सडक अर्जुनी

न्यायनिर्णय/आदेश दिनांक : १२.११.२०२२
पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख : १२.११.२०२२
न्यायनिर्णय/आदेश अपलोड केलेली तारीख : १२.११.२०२२